# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १३३/२०११-१२ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. संजय सिताराम माळी,<br>मु.पो. दरिबडची, ता. जत, जि. सांगली. | अर्जदार |

**विरुध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,<br>सं व सु मंडळ कार्यालय, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली | विरुध्द पक्षकार |

कोरम : १) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
२) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. संजय सिताराम माळी, मु.पो. दरिबडची, ता. जत, जि. सांगली यांनी मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी संख उप विभाग विरुध्द तक्रार दि. ११.१०.२०११ रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

अर्जदार यांनी आपल्या शेतीपंपास नवीन वीज जोडणी मिळावी यासाठी वि.प.कडे अर्ज केला व दि. १५.६.२०१० रोजी चलन भरले असून चाचणी अहवाल ३.८.२०१० ला दिला आहे. अर्जदार ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. ६.१.२०११ ला तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाकडे कृती मानके विनियमानुसार वीज पुरवठा मिळावा अन्यथा विनियमातील तरतुदीनुसार ग्राहक भरपाई मिळावी अशी ग्राहकाने मागणी केली आहे. अंतर्गत कक्षाने दि. १७.६.२०११ रोजी आदेश पारीत केला. आदेशानुसार काम न झालेमुळे ग्राहकाने मंचाकडे प्रस्तुतची तक्रार दाखल केली. मंचाकडून अपेक्षित मदत - त्वरित वीज पुरवठा मिळावा व विलंबाबाबत भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे. अर्जासोबत चलन भरल्याच्या पावतीची झेरॉक्स जोडली आहे.

वितरण कंपनीने दि. ९.११.२०११ रोजी आपला लेखी अहवाल सादर केला. प्रस्तुत तक्रारीची सुनावणी दि. ९.११.२०११ रोजी मंचासमोर घेण्यात आली, आपल्या लेखी अहवालात ग्राहकाने शेतीपंप वीज कनेक्शनसाठी दि. १५.६.२०१० ला चलन भरल्याचे व चाचणी अहवाल दि. ३.८.२०१० ला दिल्याचे म्हटले आहे. अर्जदाराच्या वीज जोडणीसाठी उच्चदाब वाहिनी ०.३६ कि.मी. व ०.४२ कि.मी. लघुदाब वाहिनी व ६३ केव्हीए रोहित्र उभारणीचे काम करावे लागणार आहे. सुनावणीवेळी ग्राहक हजर. वि.प.तर्फे सहाय्यक अभियंता श्री. भोसले व कनिष्ठ अभियंता श्री. कुलकर्णी, कवठे महांकाळ विभाग हे उपस्थित होते. वि.प.च्या अधिकाऱ्यांनी या केस प्रकरणी जादा माहिती हजर करण्यास दि. १६.११.२०११ पर्यंत मुदत मागितली. त्यानुसार दि. १७.११.२०११ रोजी जादा माहिती मंचासमोर दाखल केली. खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) ग्राहकाने मागणी केल्याप्रमाणे विद्युत पुरवठा करण्याचे आदेश वितरण कंपनीस देणे योग्य होईल काय ?

उत्तर : होय

२) ग्राहकास वीज जोडणीच्या विलंबाबद्दल भरपाई मंजूर करणे योग्य होईल काय ?

उत्तर : होय

## कारणमिमांसा

अर्जदार ग्राहकाने आपल्या शेतीपंपाच्या नवीन वीज जोडणीसाठी अर्ज केला व त्यानुसार चलन दि. १५.६.२०१० रोजी भरले याबद्दल दुमत नाही. चाचणी अहवाल दि. ३.८.२०१० रोजी सादर केला आहे. वि.प.ने आपल्या लेखी अहवालात अर्जदार ग्राहकाने चलनाचे रु. ५०००/- भरलेले आहेत. कलम ४३ विद्युत कायदा २००३ व विद्युत पुरवठा संहिता व पुरवठ्याच्या इतर अटी विनियम २००५ नुसार ग्राहकाचा अर्ज परिपूर्ण झाल्यानंतर वि.प.ने त्यांस वीज जोडणी देणे आवश्यक आहे. वीज जोडणी अद्यापपर्यंत न दिल्यामुळे वि.प.स ठराविक मुदतीत वीज जोडणी देण्याचे आदेश करणे योग्य होईल. मुद्दा क्र. १ चे उत्तर होय असे देण्यात येत आहे.

वीज जोडणीसाठी उच्चदाब / लघुदाब वाहिनी व ६३ केव्हीए रोहित्र उभारणी करणे आवश्यक आहे. अर्ज परिपूर्ण झाल्यानंतर १ वर्षात वीज जोडणी न दिल्यामुळे वीज जोडणी होईपर्यंतच्या कालावधीतील विलंबापोटी कृती मानके विनियम व परिशिष्ट अ नुसार प्रति आठवडा रु. १००/- या प्रमाणे ग्राहकास भरपाई मिळण्याचा हक्क आहे व वि.प.ची ती जबाबदारी आहे. त्यामुळे मुद्दा क्र. २ चे उत्तर होय असे देण्यात येत आहे.

This document was created using SmartPDFCreator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २००६ मधील नियम ८.२ नुसार तक्रारदाराचे गाऱ्हाणे ठराविक मुदतीत दूर करण्याचे आदेश वि.प.ला मंच करु शकतो. या तक्रारीत वि.प.ने दुर्लक्ष केले आहे, विलंब केल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे या ग्राहकास दि. ३१.१.२०१२ पर्यंत विद्युत पुरवठा करण्याचे आदेश देणे योग्य होईल. खालील प्रमाणे आदेश -

## आदेश

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनी संख उप विभाग, कवठे महांकाळ विभाग यांनी तक्रारदार ग्राहकास दि. ३१.१.२०१२ पर्यंत त्यांच्या शेतीपंपास नवीन वीज जोडणी द्यावी व त्याचा अहवाल मंचास सादर करावा.

३) वितरण कंपनी संख उप विभाग, कवठे महांकाळ विभाग यांनी तक्रारदार ग्राहकास दि.३.८.२०११ पासून वीज जोडणी देईपर्यंतच्या कालावधीतील विलंबापोटी रु. १००/- प्रति आठवडा भरपाई द्यावी. भरपाईच्या रकमेचे समायोजन दोन बिलींग सायकलमध्ये करुन उर्वरित रक्कम ग्राहकास रोखीने द्यावी.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखे-पासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक :

( जी. बी. पानकर )
सदस्य सचिव

अध्यक्ष, ग्राहक तक्रार निवारण मंच, महावितरण, कोल्हापूर परिमंडल : दि. ५.९.२०११ पासून पद रिक्त

श्री. जी. सी. लेले, सदस्य :

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com